# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रत्नागिरी जिल्हयातील दहा काताळशिल्पांना राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१) ७५ (२०-०३-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक वारस्थळांमध्ये समाविष्ट होऊ शकण्याची क्षमता असणाऱ्या कोकणातील प्राचीन कातळशिल्पांबाबत शासनाची अनास्था दिसून येत असल्याने दोन वर्षापासून कातळ शिल्पांच्या संवर्धन व संरक्षणाची योजना शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी, लांजा आणि राजापूर या तीन तालुक्यातील ५७ गावांमध्ये सुमारे १२०० कातळचित्रांची राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाने स्थानिकांच्या मदतीने सविस्तर नोंद केली असून त्यापैकी १० ठिकाणांचा संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव सन २०१७-२०१८ मध्ये शासनास सादर करुन देखील अद्याप प्रस्तावावर कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील १० कातळशिल्पांचे राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याबाबतचे प्रस्ताव पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाकडून सन २०१८ मध्ये प्राप्त झालेले असून सदर कातळशिल्पे ही बहुतांश खाजगी मालकीच्या जमिनीमध्ये स्थित असल्याने या जमिनीच्या मालकी हक्कात अनेक सहधारकांची नावे असून सर्व सहधारकाची सहमती मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२५-०८-२०२०) :** (१), (२) व (३) कोकणातील प्रागैतिहासीक काळाबाबत अधिक संशोधन करण्याच्या दृष्टीने सन २०१६-१७ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यात गवेषणाचे काम हाती घेण्यात आले होते. त्यात राजापूर, लांजा व रत्नागिरी तालुक्यात मिळून

५२ कातळशिल्पांसंबधी पुरास्थळे सापडली आहेत. त्यापैकी १० कातळशिल्पांना राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याचे प्रस्ताव पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाकडून सादर करण्यात आले आहेत. गोव्यातील कातळशिल्पांना तेथील राज्य पुरातत्व विभागाने संरक्षित स्मारकांमध्ये नोंद केली असून त्याच धर्तीवर कोकणातील कातळशिल्पांबाबत राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाने "संरक्षित स्मारक" म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर पुरास्थळे संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्यास तेथील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यास पर्यटन विभागाने अनुकूलता दर्शविली आहे. तथापि सदर कातळशिल्पे ही बहुतांश खाजगी मालकीच्या जमिनीमध्ये स्थित आहे. या जमिनीच्या मालकी हक्कात अनेक सहधारकांची नावे आहेत. अशा सर्व सहधारकाची सहमती मिळविण्याचा प्रयत्न संचालनालयाच्या स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जलयुक्त शिवार योजनेबाबत

**(२) ८४ (१०-०४-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यू पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.प्रदिप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाणी टंचाई दुर करण्याकरिता सुरु करण्यात आलेली जलयुक्त शिवार योजनेची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपल्यानंतर सदरहू योजनेला मुदत वाढ न देता स्थगिती देऊन यापुढे या योजनेस निधी न देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेला नाशिक विभागीय महसूल कार्यालयाने स्थगिती दिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन स्थगिती देण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे नाशिक जिल्हयातील टंचाईग्रस्त भागातील ८७ कामांसह मोठ्या प्रमाणावर असलेली कामे आता होणार नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील या योजनेच्या कामांना स्थगिती देऊन यापुढे या योजनेस निधी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन राज्यातील पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने अन्य योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. नाशिक जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ अंतर्गत सुधारीत आराखड्यातील सर्व ५३३९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
(३) व (४) जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ मधील दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पूर्वी सूरू असलेली अपूर्ण कामे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्यास शासनपत्र दिनांक २४/२/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाल संरक्षण कक्षात अनुभवी कंत्राटी कर्मचाऱ्यांची पुन्हा नियुक्ती करण्याबाबत

**(३) १२५ (१३-०४-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाची एकात्मिक बाल संरक्षण योजना राज्य शासनाने राज्यस्तरांवर राबवताना सन २०१३ मध्ये प्रत्येक जिल्हयात बाल संरक्षण कक्ष स्थापन करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या बाल संरक्षण कक्षात कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या अनुभवी कर्मचाऱ्यांना काढून त्यांच्या जागी आयुक्त आणि कार्यक्रम व्यवस्थापक यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये आपल्या मर्जीतल्या व अनुभव नसलेल्या कर्मचाऱ्यांची भरती केल्याची तक्रार अनेक वर्षे काम केलेल्या कंत्राटी कामगारांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे तीन वर्षाचे कंत्राट संपले तरी ते नियमानुसार दोन वर्षांनी वाढवून देण्याची तरतूद असतांना त्याआधीच कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(५) असल्यास, बाल संरक्षण कक्षात नियमबाहय भरती थांबवून अनुभवी कंत्राटी कर्मचाऱ्यांची पुन्हा नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२६-०८-२०२०) :** (१) होय.
(२) श्री. महेश झरकर, श्री सुहास बोंदरे, श्री. राहुल वैराळे, श्री शशांक वैद्य या बाल संरक्षण कक्षामध्ये पूर्वी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी शासनास निवेदन दिलेले आहे.
(३) नाही.

एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या मार्गदर्शिका, २०१४ प्रकरण ५ मधील ३.४ नुसार जिल्हा बाल संरक्षण कक्षात नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रथम ३ वर्षासाठी नियुक्ती देऊन तद्नंतर २ वर्षांची मुदतवाढ देण्याची तरतुद आहे. तद्नंतर त्यांना सेवेत मुदतवाढ देण्याबाबत तरतूद नाही.

तथापि, एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षामध्ये सन २०१९ मध्ये नव्याने कंत्राटी पदभरती करण्यात आली असून सदर पदभरतीमध्ये जुन्या अनुभवी कर्मचाऱ्यांना अधिक गुण देऊन प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच आतापर्यंत नव्याने कंत्राटी पदभरतीच्या ३३२ पदांमध्ये पूर्वी कंत्राटी पध्दतीने कार्यरत ६८ कर्मचारी पात्र ठरले असून त्यांना नियुक्ती देण्यात आलेली आहे,
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विदर्भ विकास मंडळासह तिन्ही मंडळांचा कार्यकाळ वाढविण्याबाबत

**(४) १२७ (११-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : अभिमान्यू पवार (औसा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव)** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विदर्भ विकास महामंडळासह तिन्ही मंडळांचा कार्यकाळ दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी व त्यासुमारास समाप्त होत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भाला विकासाकडे मार्गक्रमण करणाऱ्या विदर्भ विकास महामंडळासह तिन्ही मंडळांचा कालावधी वाढविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०७-२०२०) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तिन्ही विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## आपटा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखे मधून कर्ज घेतल्या प्रकरणी शेतक-याची फसवणूक झाल्याबाबत

**(५) २७९ (१६-०४-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आपटा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखे मधून कर्ज घेतल्या प्रकरणी श्री.महेंद्र देशमुख या शेतक-याची फसवणूक झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांकडे चौकशी करण्याबाबत निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्र्यांनी राज्याचे कृषीमंत्री यांना या कर्ज फसवणूक प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२७-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्री.महेंद्र देशमुख यांनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी दिलेल्या निवेदनाबाबतीत चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, रायगड यांना दिले होते.
(३) जिल्हाधिकारी, रायगड व राज्यस्तरीय बँकर्स समिती, पुणे यांच्याकडून प्राप्त चौकशी अहवालावरुन असे दिसून येते की, श्री.महेंद्र देशमुख यांनी बँक ऑफ इंडिया, शाखा आपटा येथून सन २००६ मध्ये रुपये १,५०,०००/-, तदनंतर सन २००७ मध्ये वाढीव रुपये ५०,०००/- व सन २००९ मध्ये रुपये ८,००,०००/- विट व्यवसायासाठी “वर्कींग कॅपिटल कॅश क्रेडिट” कर्ज घेतले होते. या कर्जापोटी श्री.महेंद्र देशमुख यांनी त्यांच्या बँकेतील मुदत ठेवी तारण ठेवल्या आहेत. श्री.महेंद्र देशमुख यांनी सदर कर्जाची परतफेड नियमित न केल्याने त्यांच्या बँकेतील मुदत ठेवी कर्ज रकमेच्या थकीत वसुल होण्याकरिता बँक ऑफ इंडिया, शाखा आपटा कडून

वर्ग करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी, रायगड व राज्यस्तरीय बँकर्स समिती, पुणे यांनी पाठविलेल्या अहवालानुसार बँक ऑफ इंडिया, आपटाकडून श्री.महेंद्र देशमुख यांचा "वर्कींग कॅपिटल कॅश क्रेडिट" कर्जवसुलीसाठी केलेली प्रक्रिया ही बँकेला असलेल्या अधिकारात राहून केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बालहक्क संहिता राबविण्याबाबत**

**(६) ३४० (२५-०३-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे बालकाच्या मुलभुत हक्कांसाठी बालहक्क संहिता तयार करण्यात आली असून विशेषतः महाराष्ट्रा मध्ये बालहक्क संरक्षीत करण्यासाठी संस्थांना कर्मचाऱ्यांअभावी कागदोपत्री अपूर्ण असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालहक्क संहिता उपलब्ध नसल्याने बालविवाह, बालमजुरी व कुपोषणा सारख्या समस्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संयुक्त राष्ट्र संघाची बालकांच्या हकांवर आधारित बालहक संहिता करार दिनांक २० नोव्हेंबर १९८९ रोजी भारताने स्विकारला असूनही महाराष्ट्रा मध्ये बालहक्क संहिता योग्य प्रकारे राबविली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला व बालकल्याण विभागाने बालहक्क संहिता संरक्षीत करण्यासाठी संस्थांना कर्मचारी उपलब्ध न करून दिल्याने संबंधित विभागातील उच्च व जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०८-२०२०) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) संयुक्त राष्ट्र संघाची बालकांच्या हक्कांवर आधारीत बालहक्क संहिता सन १९८९ मध्ये निश्चित करण्यात आली असून भारताकडून सदर संहितेस दि. २० नोव्हेंबर, १९९२ रोजी मान्यता देण्यात आली आहे. या संहितेमधील तरतूदींची अंमलबजावणी राज्य शासनाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

### अमरावती शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत

**(७) ५७३ (२०-०३-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत समिती स्थापन करुन या समितीने अहवाल संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२३-०७-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापनेच्या अनुषंगाने तपासणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्हयातील नविन प्रकल्पांना मंजूरी व पूर्वीपासून प्रलंबित असलेल्या लघुसिंचन प्रकल्पाना तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) ८२२ (१६-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील नविन प्रकल्पांना मंजूरी व पूर्वीपासून प्रलंबित असलेल्या लघुसिंचन प्रकल्पांना तात्काळ निधी उपलब्ध करुन प्रकल्पाची कामे पुर्णात्वास नेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजापूर तालुक्यातील काही प्रकल्प पाणी उपलब्धता प्रमाणपत्रा अभावी रद्द करण्यात आलेले आहेत तर काही अतिरिक्त दायित्व निर्माण झाल्याने रद्द करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजापूर तालुक्यात तीव्र पाणी टंचाई निर्माण झालेली असून तालुक्यातील लघुसिंचन प्रकल्पाची कामे प्रलंबित असल्याने सदरहू कामे प्राधान्याने घेऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१८-०८-२०२०) :** (१) अशंत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणी नुसार रत्नागिरी जिल्हयातील १० ल.पा. योजनांची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळास सादर करण्यात आली होती. तथापि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २.३.२०१९ रोजीच्या ५६ व्या बैठकीमध्ये, "कोकण प्रदेशातील प्रस्तावित योजनांचे दायित्व व पुर्वीचे शिल्लक दायित्व विचारात घेता १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ल.पा. योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात येवू नये, तथापि भविष्यात निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने सदर योजनांच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाबाबत फेरविचार करण्यात यावा," असा ठराव पारित करण्यात आल्याने सदर योजनांच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येतील. सद्यस्थितीत रत्नागिरी जिल्हयात शासनांतर्गत ९ योजना प्रगतीपथावर असून सदर योजनां पूर्ण करण्यासाठी रुपये १०२.९८ कोटी इतका निधी आवश्यक आहे. तसेच महामंडळांतर्गत ४९ योजना प्रगतीपथावर असून सदर योजनांना रुपये ४९७.२९ इतक्या निधीची आवश्यकता आहे. सदर योजना निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्यात येतील.

(२) अंशत: खरे आहे.

राजापूर तालुक्यातील योजनांची प्रशासकीय मान्यता अतिरिक्त दायित्व निर्माण झाल्याने रद्द करण्यात आल्याचे दिसून येत नाही, तथापि ल.पा. योजना जांभवली व ल.पा. योजना तुळसवडे या २ योजनांची प्रशासकीय मान्यता पाणी उपलब्धता प्रमाणपत्राअभावी रद्द करण्यात आली आहे.

(३) राजापूर तालुक्यात महामंडळ व शासनांतर्गत ७ योजना प्रगतीपथावर असून सदर योजना पूर्ण करण्यासाठी रुपये ९९.३२ कोटी नीधी आवश्यक आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यांने योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हयातील शेकडो गावे जलयुक्त शिवार योजने पासून वंचित असल्याबाबत

**(९) १०७८ (११-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील शेकडो गावे जलयुक्त शिवार योजने पासून वंचित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील एकूण ७०७० गावापैंकी ४१९ गावामध्ये जलसंधारणाची कामे झाली मात्र उर्वरीत गावाची माहे डिसेंबर २०१९ मध्ये मुदत संपत असल्याने ही गावे वंचित राहीली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेमुळे सर्व गावे टँकर मुक्त होत असतानाही या गावांना जलयुक्त शिवार योजनेची मुदत वाढून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) व (२) हिंगोली जिल्हयात एकूण ७०७ गावांपैकी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गाव निवड निकषानुसार सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या कालावधीत पात्र ४१९ गावांची निवड करण्यात आली.
(३) जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ मधील दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पूर्वी सूरू असलेली अपूर्ण कामे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्यास शासनपत्र दिनांक २४/२/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात जलशक्ती अभियानांतर्गत जलसाठ्याची निर्मिती करणेबाबत**

**(१०) १०९१ (११-०४-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात केंद्र सरकारच्या पुढाकारातून जलशक्ती अभियानांतर्गत सुमारे ४४ ग्रामपंचायतीतील ८२ गावामध्ये तब्बल ९०५ जलसाठ्याची निर्मिती करण्यात आल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयात ७७९ जलस्त्रोतामधील गाळ काढून सुमारे ११४ शोषखड्डे तयार करण्यात आले असून गावक-यांच्या माध्यमातून मोहिमेत सुमारे ४८,५४८ झाडे लावण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नागभीड तालुक्यातील जलसाठे निर्मितीसाठी समावेश नसल्याने नागभीड तालुक्यातील मोहाडी जवळील कुनघाडा चक चा खणीचा तलाव व पहारणी जवळील हत्ती काळा गोटा तलावाची समावेश करण्याची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलसाठे निर्मितीसाठी मोहाडी जवळील कुनघाडा (चक) येथील खणीचा तलाव व पहारणी जवळील हत्ती काळा गोटा तलावाचा समावेश झाल्यास परिसरातील अंदाजे २०० हेक्टर च्या तलावामधून अल्पखर्चात किमान १००० हेक्टर सिंचन सहज शक्य आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जलशक्ती अभियानांतर्गत चंद्रपूर जिल्हयाच्या जलसाठ्याची निर्मिती योजनेत मोहाडी जवळील कुनघाडा (चक) येथील खणीचा तलाव व पहारणी जवळील हत्ती काळा गोटा तलावाचा समावेश करण्याची मागणी प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही. केंद्र पुरस्कृत जलशक्ती अभियान अंतर्गत समाविष्ट असलेल्या ०८ जिल्हयामध्ये चंद्रपूर जिल्हयाचा समावेश नाही.
(२), (३), (४), (५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(११) १३२१ (१३-०४-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची घोषणा शासनाने केली असल्याने उस्मानाबाद येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करावे म्हणून तेथील लोकप्रतिनिधी मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन अंदाजे रु. ३५ कोटी खर्चून जिल्हा शासकीय रुग्णालयाची नवीन सुसज्ज इमारत गेल्या ३ ते ४ वर्षापासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया (एमसीएल) च्या कायद्यानुसार आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यापैकी एक सदरहू वैद्यकीय शासकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यानी जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेली ४ एकर जागा जिल्हा सामान्य रुग्णालयास हस्तांतरित केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उस्मानाबाद येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याच्या दृष्टीने तत्कालीन शासनाने प्राथमिक तपासणी करण्यासाठी तज्ञाची समिती नेमुन सदरहू तज्ञ समितीने त्यांचा अहवाल शासनाकडे पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने उस्मानाबाद येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२३-०७-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीमध्ये इमारत बांधकाम पूर्ण झाले असून सदर इमारतीचा तळमजला व पहिल्या मजल्यावर माहे फेब्रुवारी, २०१८ पासून बाहयरुग्ण विभाग कार्यान्वीत करण्यात आला आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषदेच्या मालकीची २ एकर १२ गुंठे जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयास हस्तांतरीत केली आहे.

(५) व (६) होय, हे खरे आहे.

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापनेच्या अनुषंगाने तज्ञ समितीमार्फत तपासणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

___

**ऑनलाईन लॉटरीवर बंदी घालण्याचा प्रस्तावाबाबत**

**(१२) १३५१ (१३-०४-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन लॉटरीवर बंदी घालण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०१-०७-२०२०) :** (१) तूर्त धोरणात्मक निर्णय झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेबाबत**

**(१३) १३७२ (१३-०४-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) श्री योगेशदादा कदम (दापोली):** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे पाठपुरावा करेल अशी घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१७-७-२०२०) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र विधान मंडळाचे सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये मांडलेल्या प्रस्तावावरील उत्तरामध्ये "कोकणाकरिता स्वतंत्र वैधानिक महामंडळाचा मुद्दा सातत्याने सभागृहामध्ये मांडण्यात येतो. यासंदर्भात विधिमंडळाने ठराव करून केंद्र शासनाकडे पाठविला आहे. त्याबाबत पुन्हा एकदा राज्य सरकारकडून सदर ठरावाचा पाठपुरावा करण्यात येईल. तसेच, केंद्र शासनाला पुन्हा विनंती करण्यात येईल. कोकण विकास मंडळाच्या स्थापनेकरिता राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करेल" असे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते. त्यानुषंगाने, तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे विनंती केली आहे. तसेच दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ व दिनांक ०७ सप्टेंबर, २०१९ च्या पत्रान्वये कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता सत्वर निर्णय घेण्याची विनंती केंद्र शासनास परत केली आहे.

कोकणाकरिता स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२)(क) मध्ये सुधारणा करणे आवश्यक असून सदर कार्यवाही केंद्र शासनाच्या स्तरावर अपेक्षित आहे.

---

**राज्यात राष्ट्रीयकृत, खाजगी, व्यापारी, नागरी आणि काही सहकारी बँकानी उद्योजक, व्यापारी, शेतकरी यांना खाजगी कंपनीची विमा पॉलिसी घेण्याची अट घातल्याबाबत**

**(१४) १५६४ (१६-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीयकृत, खाजगी, व्यापारी, नागरी आणि काही सहकारी बँकानी उद्योजक, व्यापारी, शेतकरी यांना कर्ज हवे असेल तर खाजगी कंपनीची विमा पॉलिसी घेण्याची अट घातल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुढील वर्षाचा हप्ता भरणे शक्य न झाल्यास सदरची पॉलिसी रद्द झाल्यामुळे खाजगी विमा कंपनीला कमिशन घेऊन कोटयावधीचा लाभ करुन देण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१६-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही. राष्ट्रीयकृत, खाजगी, व्यापारी, नागरी आणि सहकारी बँकांकडून खाजगी कंपनीची विमा पॉलिसी घेण्याची अट घातल्याची तक्रार / निवेदन राज्यस्तरीय बँकस समिती तसेच सहकार आयुक्तांकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा नियोजन समित्यांचे कामकाज पेपरलेस करण्याबाबत**

**(१५) १६८४ (१५-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा नियोजन समित्यांचे कामकाज दिनांक १ एप्रिल, २०२० रोजी पासून पेपरलेस करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०७-२०२०) :** (१), (२) व (३) जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत संनियंत्रीत करण्यात येणाऱ्या / राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम / योजनांतर्गत प्रशासकीय मान्यता, निधी वितरण, कामांचे संनियंत्रण व प्रभावी अंमलबजावणीसाठी "iPAS - Integrated Planning Office Automation System" संगणकीय प्रणाली संपूर्ण राज्यात अंमलबजावणी होण्याकरीता नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक:डीएपी-१०१९/प्र.क्र.१६३/का.१४८१, दिनांक १८/०९/२०१९ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत संनियंत्रीत करण्यात येणाऱ्या / राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम / योजनांतर्गत प्रशासकीय मान्यता, निधी वितरण, कामांचे संनियंत्रण व प्रभावी अंमलबजावणीसाठी करीता "iPAS - Integrated Planning Office Automation System" ही संगणकीय प्रणाली ३६ जिल्हयात दिनांक ०१/०४/२०२० पासून कार्यान्वीत करण्यात आली आहे.

---

**मौजे कोकळगाव -सांगवी (जि.लातूर) येथे तेरणा नदीवर सांगवी ते कारला, नदी हत्तरगा जेवरी आदी गावातील पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी पूल तथा बंधारा बांधकाम करण्याबाबत**

**(१६) १७९२ (१५-०४-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोकळगाव -सांगवी (जि.लातूर) येथे तेरणा नदीवर सांगवी ते कारला, नदी हत्तरगा जेवरी आदी गावातील पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी पूल तथा बंधारा बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी औसा यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी उपविभागीय अधिकारी निलंगा जि.लातूर यांच्या कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत जिल्हा जलसंधारण अधिकारी ,मृद व जलसंधारण विभाग लातूर व कार्यकारी अभियंता,पाटबंधारे विभाग लातूर यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर पूल तथा बंधारा बांधकामास निधी मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, लातूर यांनी कोकळगाव-सांगवी या को.प.बंधाऱ्याचे सविस्तर सर्वेक्षण करुन रु.३७८.९३ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

सदर को.प. बंधाऱ्याचा पाणीसाठा ९९ सघमी येत आहे. या बंधाऱ्याची सन २०१८-१९ च्या दरसुचीवर आधारीत एकुण किंमत रु.३७८.९३ लक्ष नुसार प्रति सघमी किंमत रु.१४६११४ पेक्षा जास्त आहे. सदरील योजना प्रचलित आर्थिक मापदंडात बसत नाही. तथापि, मा.विधानसभा सदस्य यांच्या सुचनेप्रमाणे विशेष बाब म्हणून सदरील योजनेचे सविस्तर

अंदाजपत्रक विभागीय कार्यालयाने तयार केले आहे. अंदाजपत्रकाची तपासणी पुर्ण झाल्यानंतर प्रस्ताव सादर करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात गाव तिथे अभ्यासिका उपक्रम राबविण्याबाबत**

**(१७) १८७५ (११-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात केंद्र व राज्य लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा प्रशासनाने करिअर मार्गदर्शन उपक्रम हाती घेतला असल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपक्रमांअतर्गत जिल्हयातील विद्यार्थ्यांना तज्ञांकडून मार्गदर्शनासह जिल्हयात गावोगावात अभ्यासिका निर्माण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हा उपक्रम व अभ्यासिका प्रत्यक्षात कधीपासून सुरु होणार आहेत व ते लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे
(२), (३) व (४) "अमरावती जिल्हयात केंद्र व राज्य लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा प्रशासनाने करिअर मार्गदर्शन उपक्रम हाती घेतला असून त्यासाठी सन २०१९-२०२० करीताच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)अंतर्गतच्या नाविन्यपूर्ण योजनातून अमरावती जिल्हयातील निवडक ७ ग्रामपंचायतींमध्ये अभ्यासिका निर्मिती करण्यासाठी व त्याकरीता फर्निचर, पुस्तके इ. खरेदीसाठी रुपये १० लक्ष इतक्या खर्चास दिनांक १२/०२/२०२० रोजी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. या कामाकरीता कार्यान्वयीन यंत्रणा व आहरण व संवितरण अधिकारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी,अमरावती हे आहेत. तथापि वित्त विभागाने दिनांक ३१/१/२०२० च्या पत्रान्वये खरेदीवर घातलेले निर्बंध तसेच राज्यातील कोविड-१९ चा प्रादुर्भाव यामुळे सदर उपक्रमाची अद्यापी अंमलबजावणी करण्यात आलेली नाही"

---

**कोकणासाठी जलसंधारण कामांचे स्वतंत्र निकष तयार करण्यास होत असलेला विलंब**

**(१८) २०३८ (११-०४-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणची भौगोलिक परिस्थिती पाहता जलसंधारण कामांचे स्वतंत्र निकष तयार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती आणि त्याअनुषंगाने स्वतंत्र निकष तयार करण्याचे आदेश मा.जलसंधारण मंत्री, यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे. कोकणातील सिमेंट नाला बांध व को.प. बंधारा मापदंड निश्चिती बाबत अहवाल सादर करणेच्या सुचना मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांनी दिनांक १०.१०.२०१७ च्या बैठकीत दिल्या होत्या.
(२) सिमेंट बांधाचे आर्थिक मापदंड वाढविणेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र. मापदंड-२०१७/४५२/२०१७/लपा-२, दि.१३.०७.२०१८ अन्वये मापदंडात सुधारणा करण्यात आली. सदर मापदंड मृद व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय व परिपत्रक क्र.सासिब-२०१४/प्र.क्र.२०९/जल-७,दि.०८.०८.२०१८ अन्वये लागू करण्यात आला.

आता पुन्हा नव्याने मुख्य अभियंता कार्यालयाचे पत्र क्र.प्रशा-१/३१३४,दि.१७.७.२०१९ अन्वये कोकण प्रदेशातील सिमेंट नाला बांधा करिताचे मापदंड संधारित करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. शासन जलसंपदा विभागाचे पत्र जा क्र.२०१९/(३७९/२०१९) लपा-२ दि.७.११.२०१९ अन्वये सिमेंट नाला बांध करिताचे मापदंड सुधारीत करणेचा अंतर्भाव करुन लपा योजनांचे मापदंड सुधारित करण्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश होते. त्याअनुषंगाने कोकणासह इतर ५ प्रादेशिक विभागाचे प्रस्ताव मुख्य अभियंता कार्यालयाकडे एकत्रित करुन त्यामधील अंदाजपत्रकाची छाननी करुन शासनाकडे सादर करणेची कार्यवाही मुख्य अभियंता कार्यालयात प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत होणाऱ्या कामांना निधी मिळत नसल्याबाबत

**(१९) २०८९ (१६-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत झालेल्या कामांमुळे जमिनीमधील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढलेली असुन जलयुक्त शिवार योजना बंद करण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बुलडाणा जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत आतापर्यंत कोणकोणती कामे करण्यात आली त्यावर किती खर्च झाला व किती कामे पूर्णत्वास गेली वा किती अर्धवट स्वरुपात आहेत, त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू योजना चालू ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही. जलयुक्त शिवार अभियानाची मुदत ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत होती. जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ मधील दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पूर्वी सूरू असलेली अपूर्ण कामे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्यास शासनपत्र दिनांक २४/२/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली.
(३) बुलडाणा जिल्हयात सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या कालावधीत जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सलग समतल चर, खोल सलग समतल चर, माती नाला बांध, अनघड दगडी बांध, गॅबीयन स्ट्रक्चर, सिमेंट नाला बांध/दुरूस्ती, ढाळीचे बांध, शेततळे, नाला खोलीकरण/सरळीकरण, पाझर तलाव/ दुरूस्ती, केटी वेअर/दुरूस्ती, विहीर पुनर्भरण इ. विविध प्रकारची २५१३८ कामे पूर्ण करण्यात आली असून त्यावर रू.४७८.४७ कोटी खर्च झाला आहे. उशिराच्या पावसामुळे अपूर्ण १३१ कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयात कोल्हापुरी बंधारे व इतर कामे मुदतीत पूर्ण न झाल्याबाबत

**(२०) २१३३ (११-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात लघुसिंचन विभागाच्या वेळकाढू धोरणामुळे कोल्हापुर पध्दतीचे बंधारे व इतर कामे मुदतीत पूर्ण न झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लघु सिंचन विभागाच्या अंतर्गत मंजुर झालेल्या ४० कामापैंकी किती कामे पूर्ण झाली आहेत,
(३) असल्यास, मंजुर झालेली परंतू अपूर्ण असलेली कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१८-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद अंतर्गत असणाऱ्या मृद व जलसंधारण विभाग, नांदेड विभागाने हिंगोली जिल्हयात ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेची ५ व १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेचे १ असे एकूण ६ कोल्हापूर

पध्दतीच्या बंधाऱ्याची कामे पूर्ण करुन ४५६ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण केले आहे. तसेच जिल्हा परिषद, हिंगोली विभागाने मंजूर असलेल्या ४० कामांपैकी ३४ कामे पूर्ण केलेली असून ४ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित २ कामे रद्द करण्यात आलेली आहेत.

लघूसिंचन व जिल्हापरिषद विभागामार्फत एकूण ४० कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत तर लघुसिंचन विभागाची ५ व जिल्हा परिषद विभागाची ४ अशी एकूण ९ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश न मिळालेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्कातील फरक मिळण्याबाबत**

**(२१) २४७० (२५-०३-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत खुल्या प्रवर्गातील एसईबीसी आरक्षण लागु केल्यामुळे बाधीत झालेल्या वैद्यकीय व दंत पदवी विद्यार्थ्यांकरिता शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती करण्यासाठी दिनांक २० सप्टेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास वैद्यकीय शिक्षण विभागातर्फे शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयानुसार वैद्यकीय व दंत पदवी अभ्यासक्रमामध्ये एकूण १०६ विद्यार्थी बाधीत असून विद्यार्थी शिक्षण शुल्काच्या प्रतिपुर्तीकरिता पात्र आहेत मात्र डॉ. वसंतराव पवार वैद्यकिय महाविद्यालय, नाशिक या महाविद्यालयाने १० विद्यार्थ्यांना वैद्यकिय शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती देण्यास नकार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.वसंतराव पवार वैद्यकिय महाविद्यालय, नाशिक या महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती न देण्यामागील नेमकी कारणे काय आहेत, सदर महाविद्यालयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त शासन आदेशानुसार पात्र असलेल्या वैद्यकीय व दंत पदवीपूर्व पदव्युत्तर अभ्यासाकरिता एकूण ११२ शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२६-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

एसईबीसी व ईडब्ल्यूएस आरक्षणामुळे बाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती देण्याबाबत दिनांक २०/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) दिनांक २० सप्टेबर,२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रथम दर्शनी १०६ पदवी विद्यार्थी शुल्काच्या प्रतिपूर्तीकरिता पात्र असल्याचे दिसते.
(३) सदर विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती ही शासनामार्फत दयावयाची असून त्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) शासन निर्णय दिनांक २० सप्टेंबर,२०१९ अन्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागास प्रवर्ग (SEBC) आरक्षणामुळे बाधित झालेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपूर) महिला बचत गटासाठी मॉल उभारणेबाबत

**(२२) २६७२ (१३-०४-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जि चंद्रपूर ) येथील तनिष्का मोहोत्सव कार्यक्रमात राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी बचत गटाच्या महिलांसाठी मॉलची निर्मिती करून महिलांसाठी उद्योग निर्माण करुन देण्याची घोषणा दिनांक १० मार्च २०१५ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी ४ कोटी रुपये निधीची तरतुद करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२७-०८-२०२०) :** (१), (२) व (३) महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत राजुरा तालुक्यात माविमचे कार्यक्षेत्र नाही. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (NULM) अंतर्गत राजुरा शहरात २०१७ पासून काम सुरु करण्यात आले आहे. राजुरा येथे संपन्न झालेल्या तनिष्का महोत्सव कार्यक्रमामध्ये माविमचा कुठल्याही प्रकारचा सहभाग नव्हता.

मॉलची निर्मिती माविममार्फत केली जात नाही. तथापि, महिलांना त्यांचे उत्पादन बनविण्यासाठी योग्य स्वरुपाचे कौशल्य प्रशिक्षण माविममार्फत आयोजित केले जाते. उत्पादनाची गुणवत्ता वाढविणे, ब्रँडिंग, लेबलिंग यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यावर माविमचा भर राहतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२३) ३४३७ (१६-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील सन २०१८-१९ मध्ये एकंदरीत २४२ गावांमध्ये प्रशासकिय मान्यता मिळालेल्या जलयुक्त शिवारच्या २५८६ कामांपैकी ३३६ कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिल्लक असलेल्या ६ कोटीच्या निधीतून ही कामे पूर्ण करण्यासाठी कृषी विभागाने मुख्य सचिवांची परवानगी मागवूनही ती अद्यापर्यंत मिळालेली नाही त्यामुळे ही योजना प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चांदा ते बांदा या योजने अंतर्गत निधी उपलब्ध असतानाही सिंधुदुर्ग जिल्हयात एकही योजना राबविण्यात न आल्याबाबत

**(२४) ३५६० (११-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध संसाधनाचा वापर करण्यासोबतच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने राज्यात ""चांदा ते बांदा" ही योजना सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीसाठी चंद्रपूर व सिंधुदुर्ग या दोन जिल्हयांसाठी राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या योजनेसाठी एक राज्यस्तरीय समितीही गठीत करण्यात आली असून या योजनेसाठी १९३ कोटी रुपये निधीही उपलब्ध करुन त्यापैकी सन २०१७-१८ मध्ये ६७ कोटी, सन २०१८-१९ मध्ये ७० कोटी आणि सन २०१९-२० मध्ये ५४ कोटी असा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक निधी उपलब्ध असतानाही कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयात या योजनेअंतर्गत एकही योजना हाती घेण्यात आली नसल्याचे व त्यामुळे उपलब्ध निधी अखर्चित राहिल्यामुळे शासनाला समर्पित करावा लागत असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी उपलब्ध असताना सिंधुदुर्ग जिल्हयात एकही योजना न राबविण्याची कारणे काय व त्याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(५)असल्यास, त्यानुसार या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१७-०७-२०२०) :** (१) होय.

चंद्रपूर व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत “रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट चांदा ते बांदा योजना” हा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

(२) “चांदा ते बांदा योजने”अंतर्गत सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी एकुण रु. २४२.९६ कोटी व चंद्रपूर जिल्ह्यासाठी एकूण रु. २४८.५८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) “चांदा ते बांदा” योजनेअंतर्गत सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत सिंधुदूर्ग जिल्ह्यात रु.१५६.५९ कोटींचे १६२ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी ५४ कामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामे विविध टप्प्यांवर आहेत.

“चांदा ते बांदा” योजनेचा मंजूर कालावधी दि.३१.३.२०२० रोजी संपुष्टात येणार होता. त्यामुळे नियोजन विभागाच्या पत्र क्र.चांबायो-२०१९/ प्र.क्र.१४१ / का.१४१८, दि.१० जानेवारी, २०२० या पत्राच्या दिनांकापासून कोणत्याही नवीन कामांना/ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात येऊ नये, ज्या कामांना/ योजनांना पत्राच्या दिनांकापूर्वी कार्यारंभ आदेश दिले असतील व जी कामे/ योजना प्रगतीप्रथावर आहेत अशी कामे/योजना दि.३१.३.२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावीत, असे जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग व चंद्रपूर यांना कळविण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील जलसंधारण महामंडळाच्या अखत्यारीत राबविण्यात येत असलेले प्रकल्प अपूर्ण असल्याबाबत

**(२५) ३६२५ (०९-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ठाणे,पालघर,रायगड,रत्नागिरी,सिंधुदूर्ग या पाच जिल्हयातील जलसंधारण महामंडळाच्या अखत्यारीत राबविण्यात येणारे तब्बल १४७ प्रकल्प अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकल्प अपूर्ण राहाण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कोकणात सरासरीपेक्षा मोठया प्रमाणात पाऊस पडूनही कोकणात पाणीटंचाई जाणवत असल्याने सदरील अपूर्ण असलेले प्रकल्प तात्काळ पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे विभागांतर्गत ७९ योजनापैकी ठाणे जिल्हयातील २, रायगड जिल्हयातील ४३, पालघर जिल्हयातील २ तसेच रत्नागिरी विभागांतर्गत रत्नागिरी जिल्हयातील ४९, व सिंधुदुर्ग जिल्हयातील १९ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. ठाणे विभागांतर्गत १६ योजनांची कामे निविदा मंजूरीचे स्तरावर आहेत.
(२) ठाणे विभागांतर्गत ठाणे जिल्हयातील ९, रायगड जिल्हयातील ३ व पालघर जिल्हयातील २ योजनांची कामे वन जमीन प्रक्रियेमुळे सुरु करण्यात आलेली नाहीत व २ योजनांची कामे भूसंपादनाअभावी बंद आहेत.

भूसंपादन, काही योजना पुनर्वसनाच्या अडचणी, काही योजनांस ग्रामस्थांचा विरोध असल्याने, काही योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असल्याने तसेच निधी अभावी योजनांची कामे विहित वेळेत पूर्ण करता आली नाहीत.
(३) अपुर्ण योजनांची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक त्या योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई व्यवस्थापनाद्वारे शासन निर्णयानुसार दरवर्षी १० टक्के मानधनात वाढ मागणीचा प्रस्ताव**

**(२६) ३८१६ (१३-०४-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई व्यवस्थापनाद्वारे शासन निर्णयानुसार दरवर्षी १० टक्के मानधनात वाढ मागणीचा प्रस्ताव, मंजूरीकरिता सचिव, महिला बाल विकास, यांच्याकडे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केल्यानंतर या प्रकरणी महाराष्ट्र राज्य माविम करार तत्वावरील कर्मचारी संघटना, नागपूर यांच्यामार्फत आंदोलने करुनही अद्यापही या संदर्भात कोणताच निर्णय घेण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत, तसेच या संदर्भात निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२७-०८-२०२०) :** (१) व (२) महिला आर्थिक विकास महामंडळातील करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत यापूर्वी वेळोवेळी घेतलेले निर्णय विचारात घेता, महिला आर्थिक विकास महामंडळातील नियमित सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा निर्णय अंतिम झाल्यानंतर नियमित सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांचे मानधन यामधील तफावतीच्या अनुषंगाने तुलनात्मक अभ्यास करुन आवश्यकतेनुसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत सन २०१८-१९ मधील**
**२१ जिल्हयातील सुमारे १७ हजार कामांना मुदतवाढ मिळणेबाबत**

**(२७) ३९३७ (१६-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत सन २०१८-१९ मधील २१ जिल्हयातील सुमारे १७ हजार कामांना मुदतवाढ मिळणे करीता संबंधित जिल्हा प्रशासनाने प्रस्ताव सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) व (२) जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ मधील कामांच्या मुदतवाढीसंदर्भात जिल्हयांनी मागणी केल्यानूसार जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ मधील दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पूर्वी सूरू असलेली अपूर्ण कामे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्यास शासनपत्र दिनांक २४/२/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुद्रा कर्जाची थकबाकीच्या वसुलीबाबत**

**(२८) ४०८६ (१६-०४-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लघूउद्योजकांना कर्जाच्या रूपाने आर्थिक मदत देण्याकरिता केंद्र शासनाने प्रधानमंत्री मुद्रा येजनेचा माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान संपूर्ण देशात प्रारंभ झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यात ३१ ऑगस्ट, २०१९ अखेर ३२ हजार १९३ जणांना ३४२ कोटी रुपये मुद्रा कर्जाचे वाटप करण्यात आले असून, संपूर्ण राज्यात ४३ लाख ८६ हजार जणांना २५ हजार ७४२ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री अध्यक्ष असलेल्या तसेच विविध ४५ बँकांच्या अधिकाऱ्यांसमवेत स्टेट लेव्हल बँकर्स कमिटीची (एसएलबीसी) माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई येथे बैठक झाली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बैठकीच्या अहवालानुसार राज्यातील मुद्रा कर्जाची २० टक्के खाती एनपीए मध्ये असल्याने कर्ज वसूलीची मोठी समस्या निर्माण झाली असून बँकाही अडचणीत सापडल्या आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कर्ज वसूलीच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१-७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यात ३१ ऑगस्ट, २०१९ अखेर ३२,१९३ जणांना ३४१.७४ कोटी रुपये मुद्रा कर्ज मंजूर व रुपये ३२२.१९ कोटी प्रत्यक्ष मुद्रा कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात १३,७२,२६८ व्यक्तींना रुपये ७,२३७.५९ कोटीचे कर्ज मंजूर व रुपये.६९६२.८५ कोटीचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंधारण विभागातर्फे साठवण तलाव तोरणी व साठवण तलाव मराठवाड़ी या लघुसिंचन साठवण तलावाचे काम शेतकऱ्यांना कोणताही मोबदला न देता सुरु केले असल्याबाबत**

**(२९) ४२४० (१६-०४-२०२०). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंधारण विभागातर्फे साठवण तलाव तोरणी व साठवण तलाव मराठवाड़ी या लघुसिंचन साठवण तलावाचे काम शेतकऱ्यांना कोणताही मोबदला न देता व विश्वासात न घेता काम सुरु केले असल्याची बाब माहे डिसेंबर,२०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना जमीनी अधिग्रहण न करता निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, साठवण तलाव निर्मिती साठी शासनाच्या २०१५ च्या धोरणानुसार जमीनी अधिग्रहण करताना ४ पट मोबदला देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

तोरणी साठवण तलाव या प्रकल्पास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर दिनांक १.६.२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदर साठवण तलावाची तालुका भूमि अभिलेख या कार्यालयाकडून धरण रेषा व बुडीत क्षेत्राची मोजणी करण्यात आली असून संयुक्त मोजणी तक्ता तयार आहे. तसेच फळझाडे व इतर झाडे मोजणीकरिता संबंधित सर्व शेतकऱ्यांना नोटीस देण्यात आली आहे. त्याप्रमाणे मुल्याकन करुन मंजूरीस्तव सादर करण्यात येईल ते मंजूर झाल्यास जमीन संपादित करुनच काम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

मराठवाडी साठवण तलाव योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर दिनांक १.६.२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. भूसंपादन कायदा २०१३ नुसार सरळ वाटाघाटीने बाधीत शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. बाधीत शेतकऱ्यांच्या सहमतीने धरणाच्या पायाचे काम सुरु करण्यात आले होते. सदर कामाचे भूसंपादनासाठी रुपये २.५० कोटी निधी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत शेतकऱ्यांचा विरोध असल्यामुळे सदरचे काम बंद ठेवण्यात आले आहे.

अधिग्रहन प्रक्रिया ही खाजगी वाटाघाटीद्वारे करण्यात येत आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

त्यासाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रकल्प मापदंडात पूर्ण होणे आवश्यक आहे. शासनाने रेडीरेकनर दरापेक्षाही जादा दराने शेतकऱ्यांना मोबदला मंजूर केला आहे. साठवण तलाव मराठवाडी येथे रेडीरेकनर दर रु.१२.०१ लक्ष प्रती हेक्टर आहे. मापदंडाअंतर्गत मंडळ कार्यालयाने रुपये ४०.०० लक्ष प्रती हेक्टर एवढया रकमेस मंजूरी दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या खोल्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध देण्याबाबत

**(३०) ४२६० (१६-०४-२०२०). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या खोल्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन मंडळाने ८ कोटी रुपये मंजूर केले असतांना प्रत्यक्षात केवळ २ कोटी ५६ लाख रुपयेच उपलब्ध करुन देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून केवळ १९८ शाळेतील वर्ग खोल्यांची दुरुस्ती होणार असून जिल्ह्यातील ८०० शाळा खोल्या दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा नियोजन मंडळाने मंजूर केलेला उर्वरित निधी तातडीने उपलबध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०७-२०२०) :** (१), (२), (३) व (४) “जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१९-२० अंतर्गत प्राथमिक शाळेच्या इमारतींच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, नाशिक यांच्या शिक्षण विभागास रु.८.०० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या निधीतून स्पीलच्या कामांची रक्कम वगळता जिल्हा परिषद,नाशिक यांच्या शिक्षण विभागाकडून सन २०१९-२० करीता १९८ शाळा वर्ग खोल्यांच्या विशेष दुरुस्तीसाठी रु.८३७.६७ लक्ष इतक्या रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून देण्यात आली आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१९-२०२० अंतर्गत १९८ शाळा वर्ग खोल्यांच्या विशेष दुरुस्तीसाठी रु.७८३.९६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. नाशिक जिल्हयातील इतर शाळा वर्ग खोल्यांच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद नाशिक यांच्या शिक्षण विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२०२१ अंतर्गत उपलब्ध होणा-या निधीसंबंधात मर्यादित प्रशासकीय मान्यता देण्यासंबंधात जिल्हा नियोजन समिती, नाशिक यांच्या स्तरावर उचित कार्यवाही करता येईल.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील परिचर्या संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत

**(३१) ४३०८ (२०-०३-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील परिचर्या संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेच्या आस्थापनेवर परिचर्या संवर्गातील एकूण ४०५ पदे मंजूर आहेत त्यापैकी ३२२ पदे भरलेली असून ८३ पदे रिक्त आहेत भरलेल्या ३२२ पदांपैकी विविध प्रशिक्षणासाठी अकरा व उसनवारी तत्वावर शासकीय महाविद्यालय व रुग्णालय बारामती येथे आठ कर्मचारी पाठविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,वरील ठिकाणी परिचर्या संवर्गातील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने तेथील रुग्णसेवेवर परिणाम होत असल्यामुळे परिचर्या संवर्गातील रिक्त पदे प्रधान्याने भरण्यात यावी अशी मागणी अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई

यांनी दिनांक २४ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आत्तापर्यंत किती परीचार्याची रिक्त पदे भरण्यात आली आहे वा भरण्यात येत आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (३०-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे. दिनांक ९.१२.२०१९ रोजी महाविद्यालयीन परिषदेची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये इतर मुद्यांसोबत अधिपरिचारिकांची रिक्त पदे भरण्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.
(२) हे खरे आहे. अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बीड या संस्थेच्या आस्थापनेवर अधिपरिचारिकांची ३४५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २८२ पदे भरलेली असून ६३ पदे रिक्त आहेत. शासकीय महाविद्यालय व रुग्णालय बारामती येथे उसनवारी तत्वावर आठ परिचारिकांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) होय. हे खरे आहे.
(४) आतापर्यंत १ पद अनुकंपा तत्वावर भरण्यात आले आहे.
(५) शासन निर्णय दिनांक ११.०६.२०२० अन्वये कोविड-१९ च्या रुग्णसेवेसाठी सरळसेवेच्या कोट्यातील १००% पदे भरण्यास मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याबाबत**

**(३२) ४४११ (११-०४-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागाने सन २०१८-१९ ते २०२०-२२ पर्यंतचा सुधारीत अनुशेष कार्यक्रम आखला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम विदर्भातील सिंचनाचा अनुशेष माहे जुन, २०२२ अखेर जलसंपदा विभागाकडून भरून काढण्याचे जलसंपदा विभागाचे नियोजन आहे, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी निधीची उपलब्धता कमी असल्याने पश्चिम विदर्भातील सिंचन अनुशेष भरून काढण्याचे नियोजन पूर्ण होणार नाही, हे खरे आहे काय ,
(४) असल्यास, पश्चिम विदर्भातील सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (३१-०८-२०२०) :** (१) होय.
(२) होय.

(३) सुधारित अनुशेष निर्मुलन कार्यक्रमातील ४६ प्रकल्पापैकी ३२ प्रकल्प पंतप्रधान कृषी सिंचन योजना (PMKSY) व बळीराजा जल संजीवनी योजना (BJSY) मध्ये समाविष्ट आहेत. या प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसहाय्य व नाबार्डच्या कर्ज (LTIF, NIDA व RIDF) योजनेतून निधी उपलब्ध करण्यात येत आहे. उर्वरित १४ प्रकल्प हे अर्थोपायाच्या स्थितीनुसार निधी उपलब्ध करुन अनुशेष निर्मुलन करण्याचे नियोजन आहे.
(४) निधी, भूसंपादन व पुनर्वसन, सुप्रमा व इतर अडचणी प्राथम्याने दूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यासह धुळे जिल्हयातील महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याबाबत**

**(३३) ४६४५ (२२-०३-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यासह धुळे जिल्हयातील महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी विविध बचत गट सुरु झालेले असून या बचत गटांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जाच्या रकमेत आणि सबसीडीत वाढ करण्यात यावी, अशी मागणी महिलावर्गाने स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२७-०८-२०२०) :** (१) व (२) राज्यासह धुळे जिल्हयातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध बचत गट सुरु झाले असून या बचत गटांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जाच्या रकमेत आणि सबसीडीत वाढ करण्यात यावी, अशी मागणी महिला व बाल विकास विभागास प्राप्त झालेली नाही. महिला व बाल विकास विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेले बचत गट हे महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत स्थापन केले जातात. बचत गटांना दिले जाणारे कर्ज हे थेट बँकेमार्फत बचत गटाला दिले जाते. महिला आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज वितरण केले जात नाही. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत बचत गटांना थेट सबसीडी देण्यात येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शहरी आमदारांना जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी मिळणेबाबत**

**(३४) ४६५१ (०९-०४-२०२०). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी आमदारांना जिल्हा नियोजन मंडळाकडून ५०५४, त्या लेखशिर्षा सारखा निधी मिळणे बाबतची मागणी अनेक लोकप्रतिनिधीनी विविध माध्यमातून शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३०५४ व ५०५४ या लेखाशिर्षातून रस्ते बांधकाम / दुरुस्तीसाठी जिल्हास्तरावर निधी उपलब्ध करुन दिला जातो. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३/९/२०१६ व २९/१०/२०१६ नुसार या निधीतून “इतर जिल्हा मार्ग” व “ग्रामीण मार्गाची” कामे ही रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ मध्ये समाविष्ट असलेल्या रस्त्यांचीच प्रस्तावित करता येतात. तसेच हा निधी आमदारनिहाय उपलब्ध करण्यात येत नाही आणि प्रस्तुत निधीचे तहसिलनिहाय किंवा मतदारसंघनिहाय करण्याबाबत शासनाचे कोणतेही आदेश नाहीत. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत शहरी भागासाठी राबविण्यात येत असलेल्या (१) महाराष्ट्र नगरोत्थान अभियान (२) विकास योजना राबविण्यासाठी नगर परिषदांना सहायक अनुदान (३) विकास योजना राबविण्यासाठी महानगरपालिकांना सहायक अनुदान (४) विकास योजना राबविण्यासाठी नगर परिषदांना कर्ज (५) विकास योजना राबविण्यासाठी महानगरपालिकांना कर्ज इत्यादी कार्यक्रम / योजनांखाली महानगरपालिका / नगर परिषद / नगर पंचायतींची मागणी असल्यास संबंधित् कार्यक्रम / योजनांतून काही अटींच्या अधिन राहून अशा शहरी भागातील रस्ते दर्जोन्नती / विकासासाठी देखिल निधी उपलब्ध होऊ शकतो. आमदार महोदयांना त्यांच्या मतदारसंघातील रस्त्यांची कामे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजूर करण्याची अपेक्षा असल्यास त्यांनी संबंधित महानगरपालिका / नगर परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीकडे मागणी / प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

---

**श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व वैशपायन स्मृती महाविद्यालय, सोलापूर येथील रोजंदारी कर्मचाऱ्याच्या मागण्यांबाबत**

**(३५) ४७७३ (२२-०३-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व वैशंपायन स्मृती महाविद्यालय, सोलापूर येथील कर्मचाऱ्यांचे वेतन वारंवार थकीत राहत असून सद्यस्थितीत माहे सप्टेंबर व ऑक्टोबर,२०१९ चे वेतन थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ग ४ च्या आस्थापनेवरील १३४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने रोजंदारी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे देणे, थकीत वेतन देणे व त्यांना सदर आस्थापनेवरील रिक्त पदांवर सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२८-०७-२०२०) :** (१) नाही.

डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील रोजंदारी तत्त्वावर कार्यरत असणाऱ्या मजूरांना माहे फेब्रुवारी, २०२० पर्यंतची मजूरी अदा करण्यात आलेली आहे.

(२)सद्य:स्थितीत श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे वर्ग-४ संवर्गातील १५६ पदे रिक्त आहेत. सदरील पदावर १२० रोजंदारी कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर या संस्थेमध्ये रोजंदारी कर्मचाऱ्यांना मजूरी ही प्रतिदिवस केलेल्या कामानुसार उपलब्ध अनुदानातून अदा करण्यात येते. सदर रोजंदारी कर्मचारी यांनी औद्योगिक न्यायालय, सोलापूर येथे त्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत व प्रलंबित वेतन मिळण्याबाबत युएलपी अर्ज दाखल केला असून मा. न्यायालयाने या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्यांना कामावरुन कमी करु नये,असे अंतरिम ओदश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शासनाने राज्यातील महत्वाच्या प्रकल्पासाठी वित्तीय संस्थानकडून घेतलेल्या कोट्यावधी रुपयांना शासनाने दिलेल्या हमीबाबत

**(३६) ५१७० (२४-०४-२०२०). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निरनिराळ्या प्रकल्पांसाठी उदारणार्थ मुंबई ट्रान्स हार्बर व मेट्रो ४, राज्य मागासवर्गीय महामंडळ, मुंबई-नागपूर समृध्दी एक्सप्रेस महामार्ग आदि प्रकल्पांसाठी विविध संस्थांकडून कोट्यावधी कर्ज घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांच्या कर्जाला राज्य शासनाने हमी दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६ मध्ये शासनाने यामध्ये ६ पटीने वाढ केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वित्तीय संस्थानांकडून घेतलेल्या कोट्यावधी रुपयांच्या कर्जाचा सन २०१६ च्या प्रस्तावाला वित्त विभागाने सक्त विरोध केला, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, विभागांच्या कर्ज फेडीबाबत शासनाने निधी उभारलेला असल्याने याचा अर्थसंकल्पावर भार पडत नव्हता, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने उपरोक्त घेतलेल्या कर्ज फेडण्याबाबत काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०७-०७-२०२०) :** (१) होय. तथापि, सदर कर्ज संबंधित अंमलबजावणी यंत्रणेद्वारे घेण्यात येत आहे.
(२) होय.
(३) व (४) शासनाने हमी दिलेले प्रकल्प हे पायाभूत विकासाच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने या प्रकल्पांना कर्ज घेण्यास शासनाने हमी दिलेली आहे. त्यामुळे सन २०१६ पर्यंत दिलेल्या शासन हमीमध्ये सन २०१७-१८ या वर्षात वाढ झालेली आहे. तसेच मंत्रिमंडळाने सदर शासन हमी देण्यास मान्यता दिलेली असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(५), (६) व (७) ज्या प्राधिकरणांना वा महामंडळांना कर्ज घेण्यास शासन हमी देण्यात आलेली आहे त्या प्राधिकरण/महामंडळा मार्फत शासन हमीवर घेण्यात येणाऱ्या कर्जाची परतफेड होणार असल्याने त्याचा भार शासनाच्या अर्थसंकल्पावर पडण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात शेतक-यांच्या आधार कार्डाच्या झेरॉक्सच्या आधारे अज्ञाताने मुद्रा लोन घेतल्याबाबत

**(३७) ५३०० (०९-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर ( जि.बुलढाणा ) तालुक्यात शेतक-यांच्या आधार कार्डाच्या झेरॉक्सचा आधार घेत अज्ञाताने शेतक-यांच्या नावावर ५० हजार रुपयांचे मुद्रा लोन घेतल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२०-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र, मेहकर शाखा, जि.बुलढाणा बँकेद्वारे थकित कर्जदारांना दिनांक १४.१२.२०१९ च्या लोक अदालतीच्या नोटीसा देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये श्री.भागवत रामभाऊ साबळे यांनी प्रथम कर्ज घेतले नसल्याचे पत्र बँकेला दिले. परंतु, नंतर त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना कागदपत्रे दाखविण्यात आल्यानंतर त्यांनी दिनांक ३१.१०.२०१५.रोजी रु.५०,०००/- इतक्या रकमेचे मुद्रा कर्ज घेतल्याचे मान्य केले व त्याच दिवशी म्हणजे दिनांक २७.१२.२०१९ रोजी पूर्ण पैसे भरुन कर्ज खाते बंद केले.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बदनापूर (ता.अंबड, जि.जालना) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत काम न करता बिल वाटप केले असल्याबाबत**

**(३८) ५३५४ (०९-०४-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर (ता.अंबड, जि.जालना) या विधानसभा मतदार क्षेत्रातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत काम न करता अंबड तालुका कृषी अधिकारी श्री.तारगे यांनी बिल वाटप केले असल्याची तक्रार नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी करून त्यावर चौकशी करण्यात आली व त्याचा अहवाल दिनांक २५ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास दाखल करावयाचा असतानाही अद्याप दाखल करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अहवाल सादर न केल्यामुळे संबंधीत अधिका-यावर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्यापही चौकशी अहवाल सादर न करणा-या अधिका-यांवर तसेच तालुका कृषी अधिका-यावर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) तक्रार अर्जाच्या अनुषंगाने उप विभागीय कृषि अधिकारी, जालना तथा चौकशी अधिकारी यांनी चौकशी करून दिनांक २/१२/२०१९ रोजी विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडे चौकशी अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाकडून अनुदानित संस्थांना देण्यात आलेले कर्ज व सहाय्यक अनुदानाबाबत**

**(३९) ५३७६ (०९-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून अनुदानित संस्थांना कर्ज व सहाय्यक अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कर्ज किंवा सहाय्यक अनुदान देण्यात आलेल्या स्वायत्त संस्थांनी वार्षिक लेखे विलंबाने सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्षभरात प्राप्त झालेल्या अनुदानासाठी विभागीय अधिकाऱ्यांनी अशा संस्थांकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेणे गरजेचे असून अशी प्रमाणपत्रे वेळेत सादर न झाल्याने सार्वजनिक अनुदानावरील नियंत्रण सुटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (३१-०७-२०२०) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. प्रशासकीय विभाग व स्वायत्त संस्था / वाणिज्य उपक्रम यांच्याकडून वार्षिक लेखे वेळेवर सादर केले जात नसल्याची बाब कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आली आहे.

(३) शासकीय काम पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्रे काम करणा-या संबंधित विभागांकडून महालेखापाल कार्यालयास सादर केली जातात.

(४) शासनाचे उपक्रम, महामंडळे, शासकीय कंपन्या, सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व व्यक्ती यांना शासनाकडून केल्या जाणा-या कर्जाच्या वितरणाची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून केली जाते. तसेच कर्ज देण्यात आलेल्या स्वायत्त संस्थांचे लेखे वेळोवेळी सादर करण्याची कार्यवाही संबंधित प्रशासनिक विभागाकडून करण्यात येते.

प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास विहित कालावधीत सादर करण्याच्या व प्रलंबितता कमी करण्याच्या सूचना वित्त विभागामार्फत वेळोवेळी सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सदर प्रमाणपत्रे विहीत कालावधीत सादर न केल्यास संबंधितांविरूद्ध करावयाच्या कार्यवाहीबाबत देखील प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रलंबितता कमी करण्यासाठी विभागांनी कालबद्ध कार्यक्रम आखून कार्यवाही करण्याबाबत दि.१४.११.२०१९ च्या अर्धशासकीय पत्रान्वये पुन्हा एकदा सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच माहे ऑक्टोबर,२०१९ ते माहे डिसेंबर,२०१९ या कालावधीत प्रादेशिक विभागीय स्तरावर महालेखापाल कार्यालयातील प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत लेखा व कोषागारे संचालनालयामार्फत सर्व आहरण व संवितरण अधिका-यांकरीता कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही विभागांमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन निधी उपलब्धतेबाबत**

**(४०) ५५९६ (०९-०४-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४५४ पाटबंधारे प्रकल्पांपैंकी मागील शासनामार्फत १४१ प्रकल्प पूर्ण झाल्याचे तसेच त्यापैंकी ३१३ पाटबंधारे प्रकल्प अद्याप अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्ण राहिलेल्या सदर ३१३ प्रकल्पांसाठी सुमारे ९३,५७० कोटी रुपये इतका खर्च येणार असल्याचे दिनांक१८ जाने,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपुर्ण राहिलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी इतक्या मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (३१-०८-२०२०) :** (१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात राज्यात ४५२ पाटबंधारे प्रकल्प बांधकामाधील होते. त्यापैकी १४१ प्रकल्पांची बहुतांश कामे पूर्ण झाल्याने सदर प्रकल्प आखणीमधून वगळण्यात आले आहेत. सन २०१९-२० या वर्षात ३१३ प्रकल्प बांधकामाधीन आहेत.

(२) दि.१.४.२०१९ रोजी या ३१३ प्रकल्पांच्या कामांची उर्वरित किंमत आखणीनुसार सुमारे रु.९३,५७० कोटी इतकी होती.

(३) सद्य:स्थितीत राज्यातील बांधकामाधीन प्रकल्पांपैकी १७ प्रकल्प पंतप्रधान कृषी सिंचन योजना (PMKSY) व ७३ प्रकल्प बळीराजा जल संजीवनी योजना (BJSY) मध्ये समाविष्ट आहेत. या प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसहाय्य व नाबार्डच्या कर्ज (LTIF, NIDA व RIDF) योजनेतून निधी उपलब्ध करण्यात येत आहे. तसेच उर्वरित प्रकल्पांना अर्थोपायाच्या स्थितीनुसार जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगर जिल्हयासाठी सन २०२०-२१ करिता एकूण ३७३.३५ कोटीचा प्रारुप आराखडयास मान्यता देणेबाबत

**(४१) ५६४३ (१०-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्हयासाठी सन २०२०-२१ करिता एकूण ३७३.३५ कोटीचा प्रारुप आराखडयास मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपगनरातील बोरिवली मतदार संघातील पर्यावरण व पर्यटन दृष्टया अनेक प्रस्तावासाठी निधी अपुरा पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपनगरात भरीव निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०७-२०२०) :** (१) सन्माननीय लोकप्रतिनिधी यांचेबरोबर दिनांक २४/०१/२०२० रोजी झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२०२१ च्या अनुषंगाने केलेले सादरीकरण व नोंदविलेली आर्थिक मागणी विचारात घेऊन मुंबई उपनगर जिल्हयासाठी रुपये ३७१.३६ कोटी इतका नियतव्यय जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२०२१ करीता अंतिमत: कळविण्यात आला आहे.

(२), (३) व (४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२०२१ अंतर्गत जिल्हयातील "क" वर्ग पर्यटन स्थळांच्या विकासासाठी निधी प्राप्त होत असून या व्यतिरिक्त मुंबई पर्यटन या प्रकल्पांतर्गत मुंबई शहर व परिसरामध्ये पर्यटन विकासाच्या कामांसाठी राज्य योजनेंतर्गत रुपये १००.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई उपनगर जिल्हयासाठी निश्चित केलेल्या नियतव्ययामुळे पुढील वर्षात बोरीवली मतदार संघातील निसर्ग पर्यटनदृष्टया प्रस्तावांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होणार आहे. याव्यतिरिक्त मुंबई उपनगर जिल्हयाला पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या "अ" वर्ग व "ब" वर्ग पर्यटन स्थळांच्या विकासासाठी राज्यस्तरीय प्रादेशिक पर्यटन योजनांतर्गतही मंजूर कामांसाठी निधी उपलब्ध होणार असल्याने मुंबई उपनगर जिल्हयास निसर्ग पर्यटन विषयक कामांसाठी भरीव निधी प्राप्त होणार आहे.

---

## बोराटी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील आदिवासी परिसरातील मंजूर तलावाचे काम अपुर्ण असल्याबाबत

**(४२) ५७४९ (१०-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोराटी, (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) यथील आदिवासी परिसरातील पाटबंधारे विभाग लघु प्रकल्प अंतर्गत मंजुर तलावाचे काम पुर्ण न झाल्यामुळे परिसरात दुष्काळ निर्माण झाला असल्याचे स्थानिकांनी दिलेल्या निवेदनावरून दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावा करिता संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला अद्याप शेतक-यांना देण्यात आला नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजुर तलावाचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) होय. हे. अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. संबंधीत शेतकऱ्यांना ८० टक्के भुसंपादन मोबदला रक्कमेपैकी रु.६३.७९ लक्ष रक्कम अदा करण्यात आली आहे. नविन भुसंपादन कायदा सन-२०१३ नुसार सरळ खरेदीद्वारे उर्वरित भुसंपादन मोबदला रक्कम अदा करण्यासाठी सरळ खरेदीचा प्रस्ताव

संबंधीत सर्व शेतकऱ्यांचे संमतीपत्र प्राप्त करुन सादर करण्यात आला आहे. नविन भूसंपदान कायदा सन-२०१३ नुसार वाढीव भुसंपादन मोबदला देणे क्रमप्राप्त ठरत असल्याने त्याअनुषंगाने सरळ खरेदीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) सदर कामासाठी प्रामुख्याने भुसंपादन होणाऱ्या वाढीव खर्चास महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने दि.११/१/२०१९ रोजी सु.प्र.मा.प्रदान केली आहे.
(४) विलंब झाला नाही.

---

**साजगांव- मोहाडी-पहान (ता.पाचोरा-भडगांव, जि.जळगांव) या रस्त्यावरील मोहाडी गावाजवळील सा.क्र.१/८०० मी. वरील अपूर्ण कामाबाबत**

**(४३) ५७५५ (१०-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साजगांव- मोहाडी-पहान (ता.पाचोरा-भडगांव, जि.जळगांव) या रस्त्यावरील मोहाडी गावाजवळील सा.क्र.१/८०० मी. वरील अपूर्ण सोडलेल्या कामांसंदर्भात तत्कालिन जलसंधारण मंत्री, यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ जून, २०१९ रोजीपासून वारंवार लेखी निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरहू काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) दि.२४ जुन,२०१९ चे लेखी निवेदन क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेले नाही. जिल्हा जलसंधारण अधिकारी,म,द व जलसंधारण विभाग,जळगाव अंतर्गत ल.पा.योजना साजगाव मोहाडी योजनेचे काम प्रगतीत आहे. सदर योजनेच्या बुडीत क्षेत्रातील साजगाव-मोहाडी-पहाण रस्त्यावरील सा.क्र.१/८०० येथील पुलाच्या कामाचे, पावसाळा सन २०११ यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले. त्यामुळे सदर ठिकाणी उंच पुलाचे काम प्रस्तावित करण्यात आले. सदरचे काम स्वीकृत निविदे अंतर्गत प्रगतीत आहे. पुलाचे ९०% काम पुर्ण झालेले
असून उर्वरित काम निधी उपलब्धते अभावी झालेल्या कामाचे प्रलंबित देयक कंत्राटदारास अदा न झाल्याने कंत्राटदाराने काम बंद ठेवले आहे. व न्यायालयात दावा दाखल केला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मराठवाडा विकास कालबद्ध कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामांचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याबाबत**

**(४४) ६१९३ (१६-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा विकास कालबद्ध कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामांचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका जिल्हा परीषदेच्या सिंचन विभागाच्या उपअभियंता कार्यालयाकडून गहाळ झाल्याची बाब माहे डिसेंबर,२०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या १० ते १२ वर्षांपासून या कामांच्या संयुक्त मोजणीचे काम रखडले असुन कामांचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून दिल्या जात नसल्यामुळे वेगवेगळ्या जिल्हयातून संयुक्त मोजणीसाठी येणाऱ्या पथकातील अभियंत्यांना प्रत्येक वेळी परतावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामांचे अंदाजपत्रके व मोजमाप पुस्तिका गहाळ झालेले नाही.

(२) व (३) एकूण ४७५ कामांपैकी जिल्हा परिषद जालना कार्यालयाने संयुक्त मोजणी आदेश निर्गमित केलेल्या ६५ योजनांची व लघुसिंचन जलसंधारण मंडळ कार्यालयाने संयुक्त मोजणी आदेश निर्गमित केलेल्या ४०७ योजनामधील १६८ योजनांची संयुक्त मोजणी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. उर्वरित योजनांचे अभिलेख उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही प्रगतीत असून अभिलेख उपलब्धतेनुसार संयुक्त मोजणीच्या कार्यक्रमाची आखणी करुन मोजणी पूर्ण करण्यात येईल.

मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामांमध्ये अनियमितता केलेल्या १० अधिकारी/कर्मचारी यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात येऊन संबंधितास दोषारोपपत्र देऊन विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी खात्यामार्फत जलयुक्त शिवार योजनेव्दारे सन २०१८-१९ या वर्षाकरिता ठाणे जिल्हयातील कामे सुरु न झाल्याबाबत

**(४५) ६२५२ (१०-०४-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी खात्यामार्फत जलयुक्त शिवार योजनेव्दारे सन २०१८-१९ या वर्षाकरिता ठाणे जिल्हयातील १३५ कामांना रु. ७५,४७,०७२ रक्कमेसह प्रशासकीय मान्यता कार्यारंभ आदेश मंजूर झाले असताना कामे सुरु झाली नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे मांजरे व ढाढरे गावातील विविध योजनेव्दारे शेतीला खाचरे पाडणे, बंधार बांधणे फळबागा लावणे, पाणी अडवा-पाणी जिरवा या संकल्पनेतून कामे न करता परस्पर देयके अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपूर्ण कामाच्या यादीत तलवाडा, गांडुळवाड, अघई, वेहलोंडे, शिलोत्तर, धसई, कळभोंडे, ढाकणे, वाशाळा, फुगाळा, ठुणे, लवले, आष्टे, दापूर इत्यादी ग्रा.प.मधील गावांच्या कामाच्या यादीत समावेश नसल्याने जिल्हा कृषी अधिक्षक व कृषी आयुक्त, कोकण भवन यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कोकण आयुक्तालयातून कामांची तसेच फळबागांची किती वेळा पाहणी केली व तालुका कृषी खात्यामार्फत आतापर्यंत करण्यात आलेल्या कामांची चौकशी करुन कारवाई करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी कामात हलगर्जीपणा करणा-या संबंधित दोषी अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील भूजल पातळी खोल गेल्यामुळे जलसंधारणाची कामे करणेबाबत**

**(४६) ६३१९ (१६-०४-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यामध्ये १६५ गावातील भूगर्भातील पाण्याची पातळी बाराशे फूट खोल गेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरुड व मोर्शी तालुक्यामधील १६५ गावांच्या भूगर्भातील पाणी पातळीची वाढ करणेसाठी जलसंधारण खात्याने योजना कार्यान्वित केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरुड व मोर्शी तालुक्यात मागील पाच वर्षांमध्ये किती रुपयांचा निधी खर्च केला आहे,
(४) असल्यास,वरुड व मोर्शी तालुक्यातील १६५ गावांना दुष्काळ मुक्त करण्याकरिता व भूगर्भातील पाणीपातळी वाढण्याकरिता शासनाने एक हजार कोटी रुपयांची तरतूद करून जलसंधारणाची कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीत वरूड व मोर्शी तालुक्यात अनुक्रमे १०८ व ९० गावांमध्ये मृद व जलसंधारणाची अनुक्रमे २१०४ व १७७७ अशी एकूण ३८८१ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदर कामांवर वरूड व मोर्शी तालुक्यात अनुक्रमे रू ४०१९.३६ लक्ष व रू ३३५१.२४ लक्ष असा एकूण रू ७३७०.६० लक्ष खर्च करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरुड (जि.अमरावती) तालुक्यामध्ये मेडिकल कॉलेज सुरू करणेबाबत**

**(४७) ६३२० (१३-०४-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्या पासून नागपूर आणि अमरावती हे अंतर शंभर किलोमीटर असल्यामुळे वरुड तालुक्यातील रुग्णांची गैरसोय होते आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरुड तालुक्यामध्ये आरोग्याच्या दृष्टीने मेडिकल कॉलेज स्थापन करणेबाबत प्रस्ताव यापूर्वी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरुड तालुक्यामध्ये मेडिकल कॉलेज ची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२३-०७-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.
वरुड, जिल्हा अमरावती येथे सार्वजनिक आरोग्य विभागाचे ३० रुग्ण खाटांचे ग्रामीण रुग्णालय उपलब्ध आहे. सदर रुग्णालयामार्फत रुग्ण सेवा पुरविण्यात येत आहेत.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हा वार्षीक योजना सर्वसाधारण सन २०२०-२१ करिता राज्य स्तरीय समितीने नागपुर जिल्हयासाठी निश्चित केलेल्या अत्यल्प नियतव्ययाबाबत**

**(४८) ६७२७ (११-०४-२०२०). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपुर जिल्हयाची जिल्हा वार्षीक योजना सर्वसाधारण सन २०२०-२१ करिता सन २०१९-२० पेक्षा २२६ कोटी रुपये कमी नियतव्ययाची अंतिम करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास दिनांक १६ फेब्रुवारी २००८ च्या नियोजन विभागातील मार्गदर्शक शासन निर्णयान्वये सन २०१९-२० मध्ये दिड पट किंमतीने प्रशासकीय मान्यता दिल्या असल्याने

अशा कामाकरीता सन २०२०-२१ करिता असलेली देयता (Liability) बाबत शासनाने विचार केला आहे काय,
(३) असल्यास, सन २०२०-२१ मध्ये मागील वर्षातील देयता (Liability) दिल्या नंतर नविन कामे घेण्यासाठी अत्यल्प वाव राहत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हयाची सर्वसाधारण वार्षीक योजना रु.५२५ कोटीवरुन रु.२९९ कोटी नियतव्ययाची केल्यामुळे जिल्हयाच्या विकास वेगावर परिणाम होत असल्याने यावर उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०७-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१९-२०२० अंतर्गत नागपूर जिल्हयाकरीता रुपये ५२५.०० कोटी इतका नियतव्यय अंतिमत: मंजूर करण्यात आला होता. राज्याच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२०२१ साठी सुरुवातीस तात्पुरता नियतव्यय रुपये ९८००.०० कोटी ठरविण्यात आला होता.या नियतव्ययाचे वाटप दिनांक १७/०४/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले वाटपसुत्र व नैसर्गिक वाढीसह करुन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२०२१ अंतर्गत नागपूर जिल्हयास रुपये २८८.०० कोटी नियतव्यय देय होता. सन्माननीय लोकप्रतिनिधी यांचेबरोबर दिनांक २८/०१/२०२० रोजी झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत नागपूर जिल्हयासाठी रुपये २९९.५० कोटी इतका नियतव्यय निश्चित करण्यात आला. परंतु नागपूर ही राज्याची "उपराजधानी" असल्याने अधिकचा रुपये १००.५० कोटी विशेष नियतव्यय देऊन एकूण रुपये ४००.०० कोटी एकूण नियतव्यय जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२०२१ करीता अंतिमत: कळविण्यात आला आहे. त्यामुळे नागपूर जिल्हयासाठी निश्चित केलेल्या अत्यल्प नियतव्ययामुळे पुढील वर्षात नवीन कामे घेण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाही. याव्यतिरिक्त नागपूर जिल्हयाला विविध प्रशासकीय विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या राज्यस्तरीय योजनांतर्गतही मंजूर कामांसाठी निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागपूर जिल्हयाच्या एकंदरीत विकास वेगावर परिणाम होणे संभवत नाही.

---

## जेष्ठ कलावंताची जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड न झाल्याबाबत

**(४९) ७१०५ (१३-०४-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, विठाबाई नारायणगांवकर पुरस्कार यांची शासनाने नेमलेल्या समित्या बरखास्त केल्याने आजतागायत घोषणा झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवड समितीची अद्याप बैठकच न झाल्यामुळे विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्काराची घोषणा करण्यात आली नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पुरस्कारासाठी तातडीने समिती गठीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (३०-०७-२०२०) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक २ जुलै, २०२० अन्वये नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार स्वर्गीय रत्नाकर मतकरी यांना, शासन निर्णय दिनांक २३.०६.२०२० अन्वये संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार श्रीमती मधुवंती दांडेकर यांना तर शासन निर्णय दिनांक २३.०६.२०२० अन्वये तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कार श्रीमती गुलाबबाई संगमनेरकर यांना जाहीर करण्यात आलेला आहे.

---

**मौजे पेडगांव, (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे ऐतिहासिक बहादुरगड किल्या व किल्ल्यातील मंदिरे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत**

**(५०) ७३५३ (१३-०४-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पेडगांव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे ऐतिहासिक बहादुरगड किल्ला असून पुरातन विभागाकडून देखभाल करणेत येत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त किल्ला व किल्ल्यातील मंदिरे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२५-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
बहादुरगड किल्ला राज्य संरक्षित स्मारक नाही.
(२) सदर किल्ला व किल्ल्यातील मंदिराची पाहणी सन २०१६ मध्ये करण्यात आली आहे. हा किल्ला व मंदिरे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या उद्देशाने तहसिलदार कार्यालयाकडे महसूल विषयक कागदपत्रे मिळण्याबाबत पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाकडून पत्रव्यवहार करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.